12 MAY 2025 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेदनेचे समाजशास्त्र समजून घेण्याची गरज

## 'जेएनयू'तील प्रा. विवेक कुमार यांचे मत : शिवाजी विद्यापीठ येथे व्याख्यानाचे आयोजन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांच्या हस्ते स्वीकारताना प्रा. कराडे आणि पत्नी प्रा. सुजाता कराडे. सोबत प्रा. डी. श्रीकांत, प्रा. विवेक कुमार, प्रा. प्रल्हाद जोगदंड, कर्नाटक विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. जयश्री एस., प्रा. रमेश मांगलेकर.

प्रतिनिधी
कोल्हापूर

कौटुंबिक आणि सामाजिक अंत:प्रवाह समजून घेताना वेदनेचे समाजशास्त्रही समजून घेण्याची महत्त्वाची गरज आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी हे आव्हान पेलले पाहिजे, असे मत जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. विवेक कुमार यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख तथा ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. जगन कराडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव होते. शाल, श्रीफळ, बाबासाहेब आंबेडकर यांच्या समाजशास्त्रीय सैद्धांतिक मांडणीचा आढावा घेतला. सर्व समाजसुधारकांनी सामाजिक प्रश्नांची उकल केली. एक नवा विचार समाजासमोर ठेवला. टाकाऊ पारंपरिक मूल्यांना छेद दिला. कारण ते समाजातील दु:खाच्या मुळाशी कुटुंबव्यवस्थेपासूनच व्यापक समाजातील गुंतागुंत आणि अंतर्विरोध वाढले आहेत. त्याचा विवेकी वेध घेताना त्या प्रश्नांच्या सोडवणुकीचा मार्गही समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी सांगितला पाहिजे.

प्रा. डॉ. हरिष भालेराव यांच्यासह प्रा. प्रल्हाद जोगदंड, केले. यावेळी यावेळी धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. जयश्री एस, ज्येष्ठ प्रा. डी. श्रीकांत, प्रा. प्रल्हाद जोगदंड, प्रा. रमेश मांगलेकर, प्रा. सुजाता कराडे, डॉ. एस. एस. महाजन, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. जत्राटकर, डॉ. मक्वाना, डॉ. एस. एल. गायकवाड होते.

12 MAY 2025

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'मेटाफर' लघुपटाचे मुंबईत स्क्रिनिंग

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडून विद्यार्थ्यांचे कौतुक

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या बी. ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मेटाफर' या लघुपटाची मुंबई येथे आयोजित केलेल्या प्रतिष्ठेच्या यशवंत लघुपट महोत्सवात स्क्रिनिंगसाठी निवड झाली. यशवंतराव चव्हाण सेंटरमध्ये नुकतेच लघुपटाचे स्क्रिनिंग होऊन लघुपटाने वाहवा मिळविली.शिवाजी विद्यापीठात गतवर्षीपासून बी.ए.फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरु झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्रातील विद्यार्थ्यांनी 'मेटाफर' या स्त्री प्रधान लघुपटाची निर्मिती केली आहे. साहिल धेंडे आणि प्रवीण पांढरे या दोन विद्यार्थ्यांनी लघुपटाचे दिग्दर्शन केले आहे. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या लघुपटात महिला सक्षमीकरणाचा मुद्दा हाताळला आहे. मुंबईतील यशवंतराच चव्हाण सेंटरमध्ये 'मेटाफर'चे स्क्रिनिंग करण्यात आले.यावेळी दिग्दर्शक जब्बार पटेल, लेखक महेश लिमये, पटकथा लेखक मनिषा कोरडे, चित्रपट समीक्षक गणेश मतकरी आदी उपस्थित होते. कुलगुरु डॉ.डी.टी.शिर्के यांनी फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## शिवाजी विद्यापीठ अधिकार मंडळाची मान्यता

# पदवी-पदव्युत्तरला प्रथम वर्षापासून ६०-४० पॅटर्न लागू होणार

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून पदवी, पदव्युत्तर प्रथम वर्षापासून ६०, ४० पॅटर्न लागू होणार आहे. याला विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी नुकतीच मान्यता दिली आहे. यंदापासून या पॅटर्नची अंमलबजावणी केली जाणार आहे. याबाबतचे परिपत्रक उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल यांनी काढले आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०मध्ये सातत्यपूर्ण मूल्यमापन ही योजना आखण्यात आली आहे. त्यामध्ये कौशल्यावर आधारित शिक्षणाला महत्व देण्यात आले आहे. राज्याच्या नवीन शैक्षणिक धोरण सुकाणू समितीने ६०-४० पॅटर्नचा आग्रह धरला होता. राज्यातील बहुतांश विद्यापीठांनी हा पॅटर्न राबविण्यास सुरूवात केली आहे. त्याप्रमाणेच शिवाजी विद्यापीठ हा पॅटर्न राबविणार आहे. नुकत्याच झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीत या पॅटर्नला मान्यता देण्यात आली आहे.

याचाच भाग म्हणून ६०-४० पॅटर्न नवीन शैक्षणिक वर्षापासून पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षापासून हा पॅटर्न लागू केला जाणार आहे. दूरशिक्षण व ऑनलाईन केंद्राच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ६०-४० पॅटर्ननुसार घेण्यात येणार आहे. परंतू त्यांच्या गुणांचे रूपांतर ७०-३० मध्ये करण्यात येणार आहे. यापुर्वी ८०-२० पॅटर्न पध्दत होती. नवीन पॅटर्न राबविण्यासाठी विद्यापीठाकडून तयारी सुरू झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची महाविद्यालयातील उपस्थिती वाढेल. उच्च शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये कौशल्य विकसित होते. भविष्यात विद्यार्थ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2025
पुढारी

# कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन

**कोल्हापूर :** कर्मवीर भाऊराव पाटील यांना स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठ प्रांगणातील कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्रकुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक तथा राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. अण्णासाहेब गुरव उपस्थित होते.

12 MAY 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वेदनेचे समाजशास्त्रही समजून घेण्याची गरज

## प्रा. विवेक कुमार : डॉ. जगन कराडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

कोल्हापूर, ता. ११ : 'कौटुंबिक आणि सामाजिक अंत:प्रवाह समजून घेताना वेदनेचे समाजशास्त्रही समजून घेण्याची आज महत्त्वाची गरज आहे. समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी हे आव्हान पेलले पाहिजे', असे मत जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे प्रा. विवेक कुमार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागाचे माजी प्रमुख तथा ज्येष्ठ समाजशास्त्रज्ञ डॉ. जगन कराडे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी प्रा. कराडे यांचा सपत्नीक शाल, श्रीफळ, मानपत्र, कोल्हापुरी फेटा देऊन सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव होते.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रा. डॉ. जगन कराडे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त रविवारी सत्कार करण्यात आला. प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांच्या हस्ते सत्कार स्वीकारताना प्रा. कराडे आणि त्यांच्या पत्नी प्रा. सुजाता कराडे. शेजारी डावीकडून प्रा. डी. श्रीकांत, प्रा. विवेक कुमार, प्रा. प्रल्हाद जोगदंड, कर्नाटक विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. जयश्री एस., प्रा. रमेश मांगलेकर.

प्रा. विवेक कुमार 'सोसिऑलॉजी ऑफ प्रॉब्लेम्स ॲंड पेन्स ऑफ अदर्स' विषयावर मांडणी करताना म्हणाले, 'चार्वाक, संत रविदास ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व समाजसुधारकांनी सामाजिक प्रश्नांची उकल केली. एक नवा विचार समाजासमोर ठेवला. टाकाऊ पारंपरिक मूल्यांना छेद दिला. कारण ते समाजातील दु:खाच्या मुळाशी गेले. आधुनिक समाजात वावरत असताना वंचित, सर्वहारा समाज आणि दुर्लक्षित घटकांची दु:खे सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासकांनी समजून घेतली पाहिजेत. आज कुटुंबव्यवस्थेपासूनच व्यापक समाजातील गुंतागुंत आणि अंतर्विरोध वाढले आहेत.'

डॉ. भालेराव, प्रा. प्रल्हाद जोगदंड, संजय कोळेकर-पुणे, अरविंद हळदणकर (गोवा), संदीप चौधरी (छत्रपती संभाजीनगर), रमेश मांगलेकर (बेळगाव), अर्थशास्त्र विभागातील ज्येष्ठ प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. गिरीष मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी धारवाडच्या कर्नाटक विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. जयश्री एस., प्रा. डी. श्रीकांत, प्रा. प्रल्हाद जोगदंड, प्रा. रमेश मांगलेकर, प्रा. सुजाता कराडे, वाणिज्य विभागाचे अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन, प्रा. जी. बी. अंबपकर, प्रा. एन. डी. जत्राटकर उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 MAY 2025
पुण्यनगरी

# फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांची 'मेटाफर' यशवंत लघुपट महोत्सवात झळकली

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बी.ए. फिल्म मेकिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या 'मेटाफर' या लघुपटाची मुंबई येथे आयोजित केलेल्या प्रतिष्ठेच्या यशवंत लघुपट महोत्सवात स्क्रीनिंगसाठी निवड झाली. येथील यशवंतराच चव्हाण सेंटरमध्ये नुकतेच लघुपटाचे स्क्रीनिंग होऊन लघुपटाने वाहवा मिळवली.

शिवाजी विद्यापीठात गतवर्षीपासून बी.ए. फिल्म मेकिंग हा बारावीनंतरचा पूर्णवेळ अभ्यासक्रम सुरू झाला आहे. या अभ्यासक्रमाच्या दुसऱ्या सत्रातील विद्यार्थ्यांनी 'मेटाफर' या स्त्रीप्रधान लघुपटाची निर्मिती केली आहे. साहिल धेंडे आणि प्रवीण पांढरे या दोन विद्यार्थ्यांनी लघुपटाचे दिग्दर्शन केले आहे. विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव आणि दिग्दर्शक अनुप जत्राटकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी या लघुपटात महिला सक्षमीकरणाचा मुद्दा हाताळला आहे. मुंबईतील यशवंतराच चव्हाण सेंटरमध्ये 'मेटाफर'चे स्क्रीनिंग करण्यात आले. यावेळी ख्यातनाम दिग्दर्शक जब्बार पटेल, नामवंत छायालेखक महेश लिमये, पटकथा लेखक मनीषा कोरडे, चित्रपट समीक्षक गणेश मतकरी आदी उपस्थित होते. कुलगुरू प्रा. डॉ. दिगंबर शिर्के यांनी फिल्म मेकिंगच्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.